| | |
|---|---|
| MHNS290003992023 | यमुनाबाई पुंजा<br>वि.<br>गंगाधर शंकर |

**विशेष दरखास्त क्र.०७/२०२३**

**( जुना विशेष दरखास्त क्र.२६/२०२२ )**

**<u>आदेश निशाणी क्र.८</u>**

प्रस्तुतचा अर्ज दरखास्तदार यांनी सदर दरखास्त ही वाटपाकामी मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे पाठवून त्याबाबतचे परसेप्टसुध्दा मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे पाठविण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाले हजर झालेले आहेत व त्यांनी निशाणी ११ आणि निशाणी १२ प्रमाणे प्रकरणात म्हणणे देण्यासाठी मुदत घेतली आहे. तसेच, सामनेवाले यांनी मागिल दि.०९.१०.२०२३ रोजी निशाणी १४ सोबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे द्वितीय अपील क्र. ६४०/२०१८ दाखल असून त्यातील कामकाजाच्या सद्यस्थितीचे कागदपत्रे दाखल केले आहे. परंतु, सदर कागदपत्रावरून प्रस्तुत प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याबाबतचा आदेश आढळून येत नाही. तसेच, सामनेवाले यांनी प्रस्तुतच्या अर्जावरसुध्दा कोणतेही म्हणणे दिले नाही.

३. आजरोजी दरखास्तदार, त्यांचे विधीज्ञ व सामनेवाले हजर आहेत. सबब, प्रस्तुत प्रकरणात मा.वरिष्ठ न्यायालयाचा स्थगिती आदेश नसल्यामुळे प्रस्तुत प्रकरणाचे परसेप्ट मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे पाठविण्यास कोणतीही अडचण नाही. सबब, मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी ८ मंजूर करण्यात येतो. |
| २. | सदर दरखास्तीनुसार आणि दिवाणी अपील क्र.१०७/२०१४ मधील दि.०७.०३.२०१७ रोजीच्या हुकुमनाम्याप्रमाणे सदर दरखास्तीचे परसेप्ट मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे पाठविण्यात यावे. |
| ३. | मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांनी मा.उच्च न्यायालयाकडील द्वितीय अपील क्र.६४०/२०१८ मधील आदेशास अधीन राहुन प्रकरणामध्ये वाटपाची कार्यवाही करावी. |

**सही/—**
( माधव एस. बोराळे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
इगतपुरी.

दि.०६.११.२०२३.

(J.O. Code :- MH02022)

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS